# नियमित दिवाणी दावा क्र. ३५१/२०१५ मधील नि. ४९ वरील आदेश.

(**CNR–MHAH** २३–०००७५८–२०१५)

१. वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६, नियम १७ नुसार वादपत्रात दुरुस्ती करण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. वादीचे कथनानुसार, त्यांनी प्रस्तुतचा दावा हा जाहिर ठराव व वाटप कब्जासाठी दाखल केला आहे. वादीचे कथनानुसार, दावा कलम १ मधील वादग्रस्त मिळकतींचे गट नंबर लिहिण्यात आलेले आहेत. परंतु, वाद मिळकतींच्या चतुःसिमा देताना वादीस सदर चतुःसिमा माहिती नसल्यामुळे सर्व मिळकतींच्या चतुःसिमेच्या रकान्यात 'रेकॉर्डप्रमाणे' असा शब्द लिहिण्यात आला आहे.

२. वादीचे म्हणण्याप्रमाणे सदरचे सर्व वाद मिळकतींच्या चतुःसिमा दाव्यामधील भविष्यामध्ये होणा–या हुकूमनाम्याची अंमलबजावणी करणेकरीता नमूद करणे गरजेचे असून त्या अनुषंगाने मुळ दाव्यामध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सदरची दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची असून त्यामुळे मुळ दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होत नाही. सबब, प्रस्तुत अर्ज.

३. प्रतिवादी क्र. २ ते ५ यांनी त्याच अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध केला असून प्रस्तुत अर्ज देण्यास उशिर का झाला याबाबतचा खुलासा वादीने अर्जात दिला नसल्याचे तसेच प्रस्तुतचा अर्ज दाव्याचे कामकाज लांबविण्यासाठी दिला असल्यासाठीचे कथन केले आहे. त्यामुळे त्यांनी प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्याची अथवा मंजुर करावयाची झाल्यास खर्चाची रक्कम रुपये ५ हजार प्रतिवादींना देण्याच्या अटिवर अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादी यांचे सुविदय वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

**५.** अर्ज व म्हणण्यातील कथनांवरुन पुढील वादप्रश्न उपस्थित होतात. सदर वादप्रश्न व त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेह पुढीलप्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **वादप्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जात विनंती केल्यानुसार वादपत्रात दुरुस्ती होवून मिळण्यास वादी हक्कदार आहेत काय ? | **...होकारार्थी** |
| २. | आदेश काय ? | **अर्ज मंजूर करण्यात येतो.** |

## का र ण मि मां सा

**वादप्रश्न क्र. १ व २ बाबत –**

**६.** वादपत्र नि.१ चे अवलोकन करता, प्रस्तुत दावा हा वाटप, कब्जा व जाहिर ठरावासाठी दाखल केलेला असुन दावा कलम १ मधील मिळकतींच्या चतुःसिमा या 'रेकॉर्डप्रमाणे' अशा नमूद करण्यात आल्या आहेत. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७, नियम ३ प्रमाणे ज्यावेळी दाव्याचा विषय हा स्थावर मालमत्ता हा असेल त्यावेळी वादपत्रामध्ये सदर स्थावर मालमत्ता चतुःसिमेद्वारे ओळखली जात असेल अथवा सिध्द होत असेल अथवा क्रमांकाद्वारे ओळखली जात असेल तर सदरच्या चतुःसिमा अथवा क्रमांक वादपत्रात नमूद करणे गरजेचे आहे. अशा परिस्थतीत वादातील सर्व मिळकती या गट क्रमांकाने तसेच चतुःसिमेद्वारे ओळखल्या जात आहेत याबाबत दुमत नाही. तसेच वादीने प्रस्तुत अर्जात सर्व दावा मिळकतीच्या चतुःसिमा नमूद करुन त्याबाबतची दुरुस्ती मागितल्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७, नियम ३ प्रमाणे सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. प्रस्तावित दुरुस्ती ही केवळ तांत्रीक स्वरुपाची नसून दाव्याचा गुणदोषावर अंतिम निर्णय होण्यासाठी तसेच प्रस्तुत दाव्यामधील भविष्यात होणा–या हुकूमनाम्याची अंमलबजावणी करण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. सबब, वादप्रश्न क्र. १ चा निष्कर्ष होकारार्थी देण्यात येत असून वादप्रश्न क्र. २ करीता,

पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आ दे श**

१. नि. ४९ येथील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. नि. ४९ येथील अर्जातील विनंतीनुसार वादीने पुढील तारेखस अगर तत्पुर्वी वादपत्रात दुरुस्ती करुन दुरुस्त वादपत्राची प्रत सादर करावी व त्याची प्रत प्रतिवादींना पुरवावी.

३. दुरुस्त वादपत्राची प्रत अभिलेखावर दाखल झाल्याचे तारखेपासून ३० दिवसांचे आत मुळ प्रतिवादीने दुरुस्त वादपत्राबाबत जादा कैफीयत दाखल करावयाची असल्यास दाखल करावी.

(खुल्या न्यायालयात निवेदित व जाहीर)

AMIT NAGESH KULKARNI
Digitally signed by AMIT NAGESH KULKARNI
Date: 2023.10.12 15:21:03 +0530

**(ए. एन. कुलकर्णी)**
दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
**श्रीगोंदा, जि. अहमदनगर.**

श्रीगोंदा.
दिनांक ११/१०/२०२३.